नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २८/०६/२०२५ (शनिवार)**

## नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व धर्मांच्या धार्मिक स्थळावरील २६५ अनधिकृत भोंगे काढण्यात आले बाबत..

धार्मिक स्थळावर असलेल्या अनधिकृत भोंग्यावर तसेच ध्वनी प्रदुषण (विनयमन व नियंत्रण) अधिनियम २००० मधील तरतुदीचे पालन न करणाऱ्या सर्व धार्मिक स्थळावरील भोंग्यावर कायदेशीर कारवाई करण्याबाबत मा. उच्च न्यायालय मुंबई येथील क्रिमीनल रिट पिटीशन क्रं ४७२९/२०२१ मधील दिनांक २३/०१/२०२५ रोजी दिलेल्या न्यायनिर्णयाद्वारे मा. न्यायालयाने मार्गदर्शक तत्वे जारी केलेले आहेत. तसेच मा. उच्च न्यायालयाच्या या आदेशाच्या संदर्भाने मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांचे दिनांक ११/०४/२०२५ च्या परीपत्रकान्व्ये सर्व पोलीस घटकांना अनधिकृत भोंग्यावर कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले होते.

त्या अनुषंगाने नागपुर ग्रामीण हद्दीतील सर्व धर्मांच्या धार्मिक स्थळावर असलेले अनधिकृत भोंगे काढण्यात आले आहे. त्यात १)रामटेक पोलीस उपविभागाअंतर्गत एकुण ३४ अनधिकृत भोंगे, २) सावनेर पोलीस उपविभागाअंतर्गत एकुण ०९ अनधिकृत भोंगे ३) काटोल पोलीस उपविभागाअंतर्गत एकुण ४५ अनधिकृत भोंगे, ४) उमरेड पोलीस उपविभागाअंतर्गत एकुण १६४ अनधिकृत भोंगे, ५)नागपुर पोलीस उपविभागाअंतर्गत एकुण १३ अनधिकृत भोंगे असे एकुण **२६५ धार्मिक स्थळावर असलेले अनधिकृत भोंगे काढण्यात आले. धार्मिक स्थळावरील असलेले अनधिकृत भोंगे काढतांना मंदीर, मस्जिद, बौध्दविहार, गुरूद्वारा, चर्च अशा सर्व धार्मिक स्थळावरील अनधिकृत भोंगे काढण्यात आले आहे.**

मा. उच्च न्यायालय मुंबई यांनी जारी केलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार नागपुर ग्रामीण हद्दीतील धार्मिक स्थळावरील अनधिकृत भोंगे काढण्यात येईल तसेच सर्व धार्मिक स्थळावरील अनधिकृतरित्या लावण्यात आलेले जे भोंगे ध्वनी प्रदुषण (विनयमन व

नियंत्रण) अधिनियम २००० मधील तरतुदीचे पालन करणार नाही अशा सर्व भोंग्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

,

## अवैधरित्या प्रतिबंधीत सुगंधित तंबाखुचा साठा करून ठेवणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद,सावनेर पोलीसांची कारवाई

**पोलीस स्टेशन सावनेर** :— दिनांक २७/०६/२०२५ रोजी सावनेर पोलीसांना गुप्त बातमीदारद्वारे माहिति मिळाली की, पवन बबनराव परतेती,रा. वार्ड क्र ०६ सटवा माता मंदीर , सावनेर याचे घरात प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखुचा साठा करून ठेवला आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी तात्काळ वार्ड क्र ०६ सटवा मााता मंदीर , सावनेर येथे जावुन आरोपीच्या घराची झडती घेतली त्यांच्या घरी एका कुलुपबंद खोलीमधुन उग्र वास येत होता. त्या कुलुप बंद खोलीची उघडुन तपासणी केली असता त्यात महाराष्ट्र राज्यात बंदी असलेला सुगधीत तंबाखु मिळुन आाला. पोलीसांनी आरोपी पवन बबनराव परतेती यांना सदर प्रतिबंधीत सुगधीत तंबाखु बाबत विचारणा केली असता त्याने आरोपी नामे बालकराम दिमाखंचद मेहन्दोल, रा. वार्ड क्र ०६ सटवा माता मंदीर , सावनेर याला तो प्रतिबंधीत अन्नपदार्थाचा साठा करणार आहे हे माहीत असतांनाही कोणताही काारनामा न करता सदर खोली भाडे तत्वावर दिली आहे. पोलीसांनी सदर खोलीतुन १)बागबान तंबाखु ,२)क्रेज तंबाखु ,३)खूली सूगंधीत तंबाखु ,४)पान पराग मसाला ,५)राजश्री पान मसाला ,६) ब्लेक लेबल तंबाखु ८)डबल ब्लेक लेबल तंबाखु ९)व्ही.वन बिग तंबाखु ,१०)ब्लेक लेबल तंबाखु ऑरेंज ११)सूप्रिम पान मसाला १२) सिग्नीचर फिनेस्ट पान मसाला, १३)तूलसी जुरानी जर्दा, १४) रजनीगंधा पान मसाला १५) विमल पान मसाला ,१६) विमल पान मसाला ऑरेंज असा **एकूण ४८.३४२ किलो ग्रॅम साठा किंमती ६७,८९४ /—रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.**

नमुद आरोपीने सदर प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखु मानवी जिवीतास अपायकारक आहे. तसेच महाराष्ट्र शासनाने त्याचे उप्तादन, विक्री, साठा व वाहतुकीवर प्रतिबंध लावलेला आहे हे माहीती असतांना सुध्दा प्रतिबंधीत अन्नपदार्थाची विक्री करण्याच्या हेतुने साठा करून ठेवला. नमुद आरोपीतांविरूद्ध पोस्टे सावनेर येथे भारतीय न्याय संहीता २०२३ चे कलम

१२३, २७४, २७५, २२३,३(५) सह कलम अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियम अन्वये गुन्हा नोंद केला आहे.

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद बेला पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन बेला**:— दिनांक २७/०६/२०२५ रोजी बेला पोलीस पो.स्टे. हददीत पेट्रोलींग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या रेतीची वाहतुक केली जात आहे. अशी माहिती मिळाल्याने पोलीसांनी तात्काळ मौजा चिमनाझरी शिवार येथे मामा दा धाबा समोर, हायवे रोडवर नाकाबंदी केली असता संशयीत वाहन टाटा कंपनीचा ट्रक क्र यु.पी ११ बी.टी ९२९२ मिळुन आले. वाहनाची पाहणी केली असता त्यात रेती आढळुन आली. वाहन थांबवुन वाहन चालकाला व क्लिनर ला नाव पत्ता विचारला असता, **चालक नामे** रोहीत राजु ढोणे, वय २८ वर्षे आणि **क्लिनर नामे** आकाश देवीदास ढोणे, वय २२ वर्षे, दोघेही रा. कावरा पेठ ता. उमरेड जि. नागपुर अशी माहीती प्राप्त झाली त्यांना परवान्याबाबत विचारणा केली असता त्यांच्याकडे परवाना नसल्याचे सांगितले. पोलीसांनी पंचासमक्ष ट्रक मधुन **१) ९ ब्रास रेती किंमती ४५,०००/रूपये आणि २) ट्रक क्र यु.पी ११ बी.टी ९२९२ किंमती ३०,००,०००/—रूपये असा एकुण ३०,४५,०००/—रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.**

सदर प्रकरणी वर नमुद आरोपीतांच्या विरूध्द पोस्टे बेला येथे कलम ३०३(२), ४९(२) भा.न्या.सं सहकलम ४८(७) ४८(८) म.ज म सहीता सहकलम ४.२१. खान खनिज सह कलम ३ सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंध अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने